शहर अभियंता कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. :श अजा/ज/98932
दिनांक : ०६/०२/२०२६

## टी.डी.आर.खर्ची प्रस्ताव सुधारित कार्यप्रणाली

टी.डी.आर. खर्ची विभागाशी संबधित सर्व अभियंता यांचे समवेत दि. ०६/०२/२०२६ रोजी शहर अभियंता कार्यालयात टी.डी.आर. खर्ची प्रस्तावांचा निपटारा तत्पर होणेच्या अनुषंगाने आढावा बैठक मा. शहर अभियंता यांनी घेतली. सदर बैठकीत शहर अभियंता कार्यालयात दाखल होणाऱ्या टी.डी.आर. खर्ची प्रस्तावांचा तत्पर निपटारा होणेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यप्रणाली निश्चित करण्यात आलेली आहे.

१) टी.डी.आर.खर्ची आवक–जावक विभागाने ला.आर्कीटेक्ट/ला.इंजिनिअर यांचे मार्फत प्राप्त होणारे प्रस्ताव तात्काळ दाखल करून घ्यावे.

२) टी.डी.आर.खर्ची आवक–जावक विभागाने प्राप्त टी.डी.आर.खर्ची प्रस्ताव त्याच तारखेला संबधित कनिष्ठ अभियंता यांचेकडे प्रस्ताव छाननी करिता देण्यात यावे.

३) संबधित कनिष्ठ अभियंता यांनी प्राप्त टी.डी.आर.खर्ची प्रस्ताव आवक दिनांकापासून ३ कार्यालयीन दिवसांत छाननी करून आवश्यक असल्यास स्थळ पाहणी करून प्रस्ताव मान्यता योग्य असल्यास उप अभियंता यांचे स्वाक्षरी करिता सादर करावा.

४) संबधित कनिष्ठ अभियंता यांनी प्राप्त टी.डी.आर.खर्ची प्रस्ताव छाननी केल्यानंतर प्रस्ताव मान्यता अयोग्य असल्यास आवक दिनांकापासून ३ कार्यालयीन दिवसांत कलम ४५ अंतर्गत प्रस्ताव फेटाळण्यात यावा.

५) कलम ४५ अंतर्गत फेटाळण्यात आलेल्या प्रस्तावाशी सबंधित वास्तुविशारद आणि विकसक यांना प्रस्ताव फेटाळल्याचे संबधित कनिष्ठ अभियंता/सहाय्यक यांनी तात्काळ ई–मेल द्वारे कळविण्यात यावे.

६) मान्यता योग्य टी.डी.आर.खर्ची प्रस्ताव आवक दिनांकापासून ५ कार्यालयीन दिवसांत मा. शहर अभियंता यांचे स्वाक्षरी करिता दाखल होतील या अनुषंगाने पाठपुरावा घेण्याची जबाबदारी टी.डी.आर.खर्ची विभागातील सहाय्यक यांची राहील.

७) टी.डी.आर.खर्ची विभागातील सहाय्यक यांनी टी.डी.आर.खर्ची प्रस्तावास मा. शहर अभियंता यांची मान्यता प्राप्त झाल्याच्या दिनांकास प्रस्तावाशी सबंधित वास्तुविशारद आणि विकसक यांना प्रस्ताव मान्य झाल्याचे व प्रस्तावाशी निगडीत सर्व डी.आर.सी. मालक/कु.मु.धा. यांना डी.आर.सी. स्वाक्षरी करिता अवगत करण्यासंबधी ई–मेल द्वारे तात्काळ कळविण्यात यावे.

८) प्रस्तावाशी निगडीत सर्व डी.आर.सी. मालक/कु.मु.धा. यांची डी.आर.सी. वर स्वाक्षरी झालेनंतर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी डी.आर.सी. स्वाक्षरीकरिता मा. शहर अभियंता यांचेकडे टी.डी.आर.खर्ची विभागातील सहाय्यक यांनी सादर करावे.

९) मा. शहर अभियंता यांची डी.आर.सी. वर स्वाक्षरी झालेनंतर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या कार्यालयीन दिवशी टी.डी.आर.खर्ची अभिप्राय ऑनलाईन डिजीटल स्वाक्षरीने प्रस्तावाशी सबंधित वास्तुविशारद, विकसक आणि संबधित बांधकाम विकास विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना ई–मेल द्वारे कळविण्याची जबाबदारी टी.डी.आर.खर्ची विभागातील संबधित उप अभियंता यांची राहील.

१०) टी.डी.आर.खर्ची विभागाकडील दाखल प्रस्तावांची तपशीलवार माहिती यामध्ये मागील आठवड्यातील प्रलंबित प्रस्ताव, चालू आठवड्यातील दाखल प्रस्तावांची सद्यस्थिती याबाबत शहर अभियंता कार्यालयाच्या साप्ताहिक आढावा बैठकीत टी.डी.आर.खर्ची विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी सादरीकरण करावे. तसेच मान्यता योग्य टी.डी.आर.खर्ची प्रस्तावांचे ७ कार्यालयीन दिवसांत तत्पर निपटारा होईल यावर टी.डी.आर.खर्ची विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रण राहील.

टी.डी.आर.खर्ची विभागातील संबधित सर्व अभियंता वर्ग व सहाय्यक यांनी उपरोक्त सुधारित कार्यप्रणालीची अंवलबजावणी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

06/02/2026

(अनिरुद्ध पावसकर)
शहर अभियंता
पुणे महानगरपालिका